# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोल दिनांक १२/०६/२०१८

## गडचिरोली पोलीस दलातर्फे कंपोस्ट खत बनविण्याचे नागरिकांना प्रशिक्षण

मा. पोलीस अधिक्षक,गडचिरोली डॉ. अभिनव देशमुख साो. यांच्या संकल्पनेतुन व मार्गदर्शनाखाली पोलीस मुख्यालय, गडचिरोली येथे ओला व सुका कच-या पासुन कंपोस्ट खत बनविण्याचे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात प्रशिक्षक म्हणुन पोलीस निरीक्षक श्री. टी. सी. उपाध्याय, स्थानिक कंपनी, रा.रा.पो.बल गट क्र. १५ गोंदीया कॅम्प नागपुर हे उपस्थित होते. त्यांनी ओला व सुका कच-यापासुन कंपोस्ट खत करण्याबाबतचे प्रशिक्षण उपस्थित नागरीकांना दिले.

सदर कार्यक्रमाला उदघाटक म्हणुन श्री. जि.टी. मोरे, सहायक समादेशक रा. रा. पोलीस बल गट क्र. ८ सोलापुर, पोलीस वसाहतीतील महीला पोलीस कर्मचारी पोलीस मुख्यालयातील मेसचे स्वच्छता राखणारे कर्मचारी राज्य राखीव पोलीस बलाचे कर्मचारी व पतंजली किसान सेवा समीती गडचिरोली या संस्थेकडुन श्री. संजय देशमुख, व सौ. वर्षा देशमुख उपस्थित होते.प्रशिक्षणाची माहिती घेतल्यावर उपस्थितांनी यापुढे जमा होणारा कचरा इतरत्र न फेकता त्याचा वापर कंपोस्ट खत करणेसाठी करुन पोलीस मुख्यालय स्वच्छ ठेवु अशी ग्वाही दिली.

सदर प्रशिक्षण आयोजित करण्यास पोलीस निरीक्षक यशवंत नलावडे, पोलीस कल्याण शाखा, गडचिरोली, राखीव पोलीस निरीक्षक ठाकुर, पोलीस मुख्यालय गडचिरोली व त्यांचे सहकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.